Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 4.567 Renew (IIFS)} Vol. 40, No.1, Jan-Jun 2023. pp 97-98

# ग्रंथ परिचय

डॉ. ज्योतिराम मोरे

इंग्रजी ग्रंथ : द मान्सून

मराठी अनुवाद : मान्सून : हवामान शास्त्रीय वेध

लेखक : डॉ. पी. के. दास

मराठी अनुवादक : प्रा. विजया साळुंके

प्रकाशक : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

प्रकाशन वर्ष : २०२३

एकूण पृष्ठे : २४८

मूल्य : ३१० /– रुपये




मान्सून या शब्दाचे मूळ अरबी भाषेत आहे आणि त्याचा अर्थ ऋतू असा आहे कित्येक शतकांपूर्वी दर्यावरती लोकांनी अरबी समुद्रावरून नियमितपणे दिशेत बदल करून वाहणाऱ्या वाऱ्यांसाठी हा शब्द प्रथम वापरला हे वारे सहा महिने उत्तर–पूर्वेकडून म्हणजेच ईशान्य कडून वाहतात आणि उर्वरित सहा महिने दक्षिण–पश्चिमेकडून म्हणजेच नैऋत्येकडून वाहतात. मान्सून : हंगामी वाऱ्यांचा प्रकार तसेच ऋतुनुसार दिशा बदलणारे वारे. अशी वाऱ्यांची प्रणाली ज्यांनी उत्तर व दक्षिण गोलार्थ व्यापले आहेत. असे वारे ज्याची वाट भारतीय उपखंड व आग्नेय आशियातील प्रत्येक सजीव पाहत असतो. ज्या वाऱ्यांनी या परिसरातील जीवसृष्टि विकसित केली आहे.

डॉ. पी. के. दास लिखित ' द मान्सून ' या पुस्तकात मान्सूनच्या उत्पत्ती विषयीचा सविस्तर वृत्तांत लेखक यांनी वाचकांसाठी दिलेला आहे. इसवी सन १९७९ मध्ये मान्सून ' एक्सपेरिमेंट ' या उपक्रमा अंतर्गत ठराविक पातळीवर स्थीर राहणाऱ्या फुग्याच्या सहाय्याने संशोधन करण्यात आले होते. हिंदी महासागरावरील चक्रीवादळांचे स्थान निश्चित समजण्यासाठी हवामान विषयक उपग्रहांचा केलेला उपयोग आणि राजस्थानातील वाळवंटाचे हवामान अधिक सुसह्य कसे करता येईल या विषयांचा अंतर्भाव लेखक यांनी या पुस्तकात केला आहे. या पुस्तकात लेखक यांनी वातावरणाशी संबंधित काही वर्तमानकालीन समस्यांची ही मांडणी केलेली आहे.

' द मान्सून ' या पुस्तकाची प्रथम आवृत्ती इ. स.१९६८ मध्ये प्रकाशित झाली होती. हे पुस्तक प्रकाशित होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ गेला आहे. प्रथम आवृत्तीला वाचकांचा भरभरून प्रतिसाद लाभला म्हणून लेखक पी. के. दास यांनी आत्ताच्या या आवृत्तीत आवश्यक तेथे विषयाचा विस्तार केला आहे आणि त्याला

सुधारित रूप दिले आहे. भारतीय अवकाश संशोधन कार्यक्रमाच्या अंतर्गत ' अवकाश वातावरण शास्त्र' या नव्याने सुरू झालेल्या विषयाची माहिती या पुस्तकात लेखक यांनी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या पुस्तकात प्रस्तावना, जागतिक मानसून, मान्सूनचे प्रादेशिक पैलू, मान्सूनचे हवामान शास्त्र, हिवाळी मान्सून, पावसाच्या थेंबांची कथा व मोसमी पावसाचे भौतिकशास्त्र, मान्सून प्रयोग, मान्सूनची संख्यात्मक प्रतिमाने, राजस्थान वाळवंट एक कूट प्रश्न, मान्सूनचे ऊर्जा विज्ञान, पर्वत प्रदेश आणि मान्सून मोसमी पाऊस : दीर्घकालीन अंदाज, पूर, अवर्षण आणि दुष्काळ, मान्सूनचे अर्थशास्त्र असे एकूण १४ प्रकरणाची मांडणी केली आहे. त्यातील मान्सूनच्या ' पावसाचा दीर्घकालीन अंदाज' हे प्रकरण लेखक यांनी सविस्तर लिहिले असून त्यात अलीकडच्या काळात झालेले संशोधन व विषयाचा विकास मांडला आहे. मान्सून बद्दल एकंदरीत खूप मतमतांतरे आहेत परंतु येथे लेखक यांनी सर्व समावेशक मान्सूनचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे

तसेच ' मान्सूनचे हवामानशास्त्र ' या प्रकरणाच्या अखेरीस हवामान बदलाचा मान्सून वर काय परिणाम होऊ शकेल याबद्दलचा विचार लेखक यांनी प्रथमच मांडला. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रावर निर्माण होणाऱ्या उन्हाळी मान्सूनवर हवामान बदलाचा होणारा परिणाम अभ्यासण्यात झालेली नवीन प्रगती व त्यासाठी करण्यात आलेले प्रयोग याबद्दल देखील लेखक यांनी विस्ताराने सांगितले आहे. याबद्दलचे अंतिम निष्कर्ष अजून प्रकाशित झालेले नसल्यामुळे ही सर्व माहिती लेखक यांनी थोडक्यात दिली आहे. परंतु ही माहिती देखील मान्सूनचा वेध घेताना अतिशय दिशादर्शक वाटते. या पुस्तकातील छायाचित्रे लेखकाने भारतीय हवामान शास्त्र विभागाकडून व उपग्रहातून घेतली आहे

लेखक डॉ. पी. के. दास यांनी या पुस्तकात मान्सून विषयाची दिलेली माहिती इंग्रजी भाषेमध्ये होती. परंतु इंग्रजीचे मराठीत अनुवाद करण्याचे अवघड काम प्रा. विजया साळुंखे यांनी केले. ज्यामुळे मराठी भाषिक व मराठी भाषेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यास ही माहिती मराठी या स्थानिक भाषेत उपलब्ध झाली. त्यामुळे त्याचा फायदा स्थानिक भाषेतील सर्वांना झाला. अनुवाद करताना इंग्रजीला योग्य व स्थानिक मराठी भाषेतील अचूक शब्दांची गुंफण प्रा. विजया साळुंखे यांनी केली आहे. एखादा चुकीचा शब्द संपूर्ण माहितीचा अर्थ बदलू शकतो यासाठी अतिशय काळजीपूर्वकरीत्या हा अनुवाद प्रा. विजया साळुंखे यांनी केला आहे. खरे तर हे जड धनुष्य आहे जे प्रा. विजया साळुंखे यांनी लीलया पेलले आहे. हा विषय प्रत्येक मराठी माणसाच्या जीवनाशी जोडला गेलेला आहे त्यामुळे या विषयाची माहिती अतिशय सोप्या व स्थानिक मराठी भाषेत उपलब्ध झाल्यामुळे याचा फायदा सर्व मराठी जणांना झालेला दिसतो

या पुस्तकाच्या शेवटी शब्दसूची व विषयसूची दिल्यामुळे वाचकांना अवघड शब्दांचे अर्थ कळण्यात व एखादी संकल्पना अधिक सुस्पष्ट कळण्यास मदत होते.

या पुस्तकाचा मराठीत अनुवाद झाल्यामुळे याचा उपयोग सर्व मराठी भाषेत शिकणारे विद्यार्थी, शिक्षक, भूगोल अभ्यासक, संशोधक, कृषी अभ्यासक, नियोजक, अर्थकारणी, राजकारणी, समाज सुधारक ते अगदी जनसामान्यांपर्यंत प्रत्येकाला होईल याविषयी शंका नाही. मान्सून विषयी अधिक माहिती जाणून घेण्यात रुची असणाऱ्या सर्वांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.